# किरकोळ फौजदारी अर्ज क्र. १७६/२०२२ च्या नि.१ वर आदेश

## (पारीत दि. १७ नोव्हेंबर, २०२२)

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदाराने महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम–१३(३) नूसार तसेच महाराष्ट्र जन्म–मृत्यु नियम, २००० चे नियम–९(३) अन्वये उशिराने जन्माची नोंद घेण्यासाठी केलेला आहे.

२. प्रस्तुत प्रकरण दाखल झाल्यानंतर गैरअर्जदाराला नोटीस काढण्यात आली. त्यावर गैरअर्जदार प्रकरणात हजर होवून त्यांनी अर्जदाराचे म्हणणे कबुल केले.

३. प्रस्तुत प्रकरण तसेच त्यावरील म्हणणे प्रकरणात दाखल केलेल्या दस्तऐवजासह अवलोकन केले.

४. प्रकरणात अर्जदारातर्फे नोंदविण्यात आलेल्या पुराव्याचे व दस्तऐवजांचे अवलोकन करता पुढील मुद्दे या न्यायालया समक्ष आदेशासाठी उपस्थित झाले. ते मुद्दे व त्याबाबत करण्यात आलेल्या चर्चेला अनुसरुन आलेल्या निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. अर्जदार हे सिध्द करतो काय की, अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय? | : | **होय.** |
| २. आदेश काय ? | : | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीता** –

५. प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर या अर्जाबाबत नि.१ वरील आदेशान्वये गैरअर्जदाराला नोटीस काढण्यात आली. त्यावर गैरअर्जदाराने प्रकरणात उपस्थित होवून अर्जदाराचे कथन मान्य केले.

६. अर्जदाराचे विद्वान वकील यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचा युक्तीवाद नि.१ प्रमाणे तसेच अभिलेखावर उपलब्ध असलेल्या पुराव्याप्रमाणे केला. अंतिमतः त्यांनी असे नमुद केले की, आजपावेतो कोणीही आक्षेप, उजर व हरकत नोंदविली नाही म्हणून त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

७. अर्जदाराने प्रस्तुत अर्जात केलेली कथने नाकारण्यासाठी कोणत्याही प्रकारची हरकत आजपर्यंत न्यायालयासमोर आलेली नाही. तसेच गैरअर्जदाराने प्रस्तुत प्रकरणात कोणताही आक्षेप, उजर तथा हरकत नोंदविली नाही.

८. प्रस्तुत अर्जाबाबत अर्जदाराने नि.०७ प्रमाणे स्वतःचा पुरावा प्रतिज्ञापत्रावर सादर केला आहे व सदरहू पुरावा आजपावेतो अबाधीत असून त्याला गैरअर्जदाराने कोणत्याही पध्दतीने आव्हाण दिले नाही.

९. अर्जदाराने पुराव्यासोबत खालील दस्तऐवज दाखल केलेले आहे;–

| अ.क्र. | दस्ताचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|
| १ | जन्माची नोंद नसल्याचे अनुउपलब्धता प्रमाणपत्राची मुळ प्रत, | ०८ |
| २ | अर्जदार यांचा भाचा दुर्गेश नंदकिशोर कापडे यांचा बोनाफाईड ची छायांकित प्रत | ०९ |
| ३ | अर्जदार यांच्या आधार कार्डची पडताळणी केलेल्या छायांकित प्रत, | १० |
| ४ | अर्जदार यांचा भाचा दुर्गेश कापडे यांचे आधार कार्डची पडताळणी केलेल्या छायांकित प्रत, | ११ |

**१०.** उपरोक्त परिस्थितीत प्रस्तुत अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्याबाबत कोणताही आक्षेप, उजर, अडथळा दिसून येत नाही. करीता मुद्दा क्र.१ साठी होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीता</u> –**

**११.** मुद्दा क्र.१ करीता होकारार्थी निष्कर्ष नोंदविल्यामुळे तसेच मुद्दा क्र .२ च्या उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदारास असे निर्देषीत करण्यात येते की, अर्जदाराच्या बहिणीचा मुलगा (भाचा) नामे **दुर्गेश नंदकिशोर कापडे (जन्म दिनांक १६/०६/२००५)** यांच्या जन्माची नोंद महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम,१९६९ चे कलम–१३(३) अन्वये विहीत शुल्क आकारल्यानंतर घेण्यात यावी.

सही/–

(सी.एम. खारकर)

जळगांव जामोद — न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,

दिनांक : १७ नोव्हेंबर, २०२२ — (न्यायालय क्र.२), जळगांव जामोद जिल्हा– बुलडाणा